महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोलीस आयुक्तालय,
नवी मुंबई

# पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, पनवेल, नवी मुंबई.

---

**‘‘प्रेसनोट’’** दि. २४/०३/२०२१

## ‘‘पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—२ पनवेल मधील पनवेल तालुका पोलीस ठाणेकडून महागडया गाडया कंपनीत भाडयाने लावण्याचे बहाण्याने विश्वासाने घेवुन, त्या परस्पर विकणा—या टोळीस अटक’’

फिर्यादी श्री ज्ञानेश्वर कचरू पेढेकर, रा. बस्मेश्वर अपार्टमेंट, डेरवली, ता. पनवेल यांनी दिनांक ०६/०३/२०२१ रोजी पनवेल तालुका पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली की, त्यांची ईर्टिगा कार नं. एमएच ४३ एएन ४३९७ ही ऑगस्ट २०२० मध्ये राजशेखर चिक्केगौडा, रा. डेरवली याचे मार्फतीने सुरज नारायण पाटील व करण उर्फ जगदिश चुनीलाल चौधरी यांना दरमहा १८,०००/— रू. प्रमाणे ‘‘पी सिस्टीम’’ या कंपनीमध्ये भाडयाने लावण्याकरीता नोटरी करारनामा करून गाडीचे मुळ कागदपत्रासह दिली होती. सुरूवातीस त्यांना एक दोन महीने भाडे मिळाले परंतु ते आता भाडेही देत नाहीत व गाडीही परत करत नाहीत असे सांगितले व त्यांच्याप्रमाणेच फसवणुक झालेले इतर ०७ साक्षीदारांचे मालकीच्या गाडया सुध्दा सदर इसमांनी भाडयाने लावण्याचे अटीवर घेतल्या असताना त्यांचेही भाडयाची रक्कम आरोपी देत नसलेबाबत व आता त्यांचेशी संपर्क होत नसलेबाबत तक्रारी प्राप्त झाल्याने दिनांक ०६/०२/२०२१ रोजी मा. पोलीस उप आयुक्त, परि—२, पनवेल यांचे मान्यतेने पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे गुरनं ५७/२०२१ भादवि कलम ४०६,३४ अन्वये गुन्हा दाखल करून सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि विजय खेडकर यांचेकडे सोपविला.

प्रस्तुत गुन्हयात अशा प्रकारे अनेक गरजू लोकांची फसवणुक झाल्याने सदर गुन्हयाचा सखोल तपास करण्यासाठी मा. पोलीस उप आयुक्त, परि.२, पनवेल, नवी मुंबई श्री शिवराज पाटील, यांनी स्वतंत्र तपास पथकाची नियुक्ती करून त्यांना पुढील तपासाबाबत महत्वपुर्ण सुचना दिल्या. सदर तपास पथकातील सपोनि विजय खेडकर, पोउपनिरी आकाश पवार, व गुन्हे प्रकटिकरण पथकाचे अंमलदार यांनी पाहीजे आरोपींची माहीती मिळवण्यास सुरूवात केली असता, आरोपी नामे ’’’’’’’’’’’’’’, वय—४३, रा. प्लॉट नं. २०३, बसमेश्वर अपार्टमेंट, मु.डेरवली, पो. आजिवली ता. पनवेल जि. रायगड हा दरम्यानचे काळात गळफास घेवुन मयत झाल्याची माहीती समोर आली. त्यामुळे पुढील आरोपी कोण आहे? त्यांचे ठावठिकाणा बाबत कोणताही धागादोरा मिळुन येत नसताना निव्वळ तांत्रिक तपासाचे आधारावर सतत पाठपुरावा करून आरोपींची माहीती मिळवुन आरोपी नामे १) ’’’’’’’’’’’’’’ वय—३४, रा. गणेशनगर, वडगाव धायरी, पुणे, २) ’’’’’’’’’’’’’’, वय—३३, रा. सेक्टर १९, कोपरखैरणे यांना अनुक्रमे दिनांक १८/०३/२०२१ रोजी वडगाव धायरी, पुणे व कोपरखैरणे येथुन ताब्यात घेण्यात आले. त्यांचेकडे केलेल्या सखोल चौकशीत त्यांनी सदरची सर्व वाहने इतर पाहीजे आरोपींचे संगनमताने बनावट कागदपत्रे तयार करून विविध ठिकाणी विक्री करारनामे करून विक्री केल्याची माहीती दिली. त्याप्रमाणे तपास पथकाने नागपुर, पुणे व महाराष्ट्रातील इतर ठिकाणी जावुन प्रस्तुत गुन्हयातील ०७ वाहनांसह, पनवेल शहर पोलीस ठाणेकडील गुरनं १८६/२०२१ या गुन्हयातील एक इनोव्हा कार तसेच इतर एक ईवॉन ईरा व एक एक्सेंट कार अशी एकूण ४१,६८,०००/— रू. किंमतीची १० वाहने व गुन्हयात वापरलेले मोबाईल इ. मुद्देमाल हस्तगत करण्यात यश मिळविले. इतर पाहीजे आरोपींचा अद्याप शोध जारी आहे. सदर आरोपींनी अशा प्रकारे अनेक गरजू लोकांना फसवुन त्यांचे वाहनांचा अपहार करून परस्पर विक्री केल्याने आरोपींकडे अधिक चौकशी करीत आहोत.

दोन्हीही अटक आरोपी यांनी डी.बी.मार्ग पोलीस ठाणे, मुंबई हद्दीत एका संगणक व्यवसायिकाला संगणक साहीत्यामध्ये ०१,०८,११,०००/— (एक करोड आठ लाख अकरा हजार) रूपयांची फसवणूक केल्याबाबत डी.बी.मार्ग पोलीस ठाणे, मुंबई शहर येथे गुरनं २३/२०२१ भादवि कलम ४२०, ३४ अन्वये

गुन्हा दाखल आहे. संबधित पोलीस ठाणे हे सुध्दा सदर दोन्ही आरोपींचे शोधावर होते. परंतु ते त्यांना मिळुन येत नव्हते. सदरबाबत डीबी मार्ग पोलीस ठाणे यांना कळविण्यात आले आहे.

**आरोपींची गुन्हा करण्याची पध्दत :—** ज्या लोकांचे गाडया भाडयाने लावायचे आहेत अशा गरजू लोकांना हेरून त्यांना त्यांची ‘‘पी सिस्टीम’’ ही कंपनी असल्याचे भासवायचे. व सदर कंपनीमध्ये मोठया प्रमाणात भाडयाने वाहनांची आवश्यकता असल्याचे सांगुन संबधित गाडीमालक यांचा विश्वास संपादन करून वाहने कागदपत्रासह ताब्यात घ्यायचे. त्या बदल्यात गाडीमालकांना नोटरी केलेला करारनामा करून देवुन सुरूवातीचे एक दोन महीने गाडीचे भाडे व्यवस्थित द्यायचे त्यानंतर मोबाईलचे नंबर्स बदलून आवश्यकतेप्रमाणे कागदपत्रामध्ये फेरफार करून व बनावट कागदपत्रे तयार करून वाहने परस्पर महाराष्ट्रातील विविध ठिकाणी सदरची वाहने गोरगरीब लोकांना विकायची. त्यांनी भासवलेली ‘‘पी. सिस्टीम’’ ही कंपनी अस्तित्वात नसल्याने व आरोपी हे नेहमी मोबाईल नंबर बदलत असल्याने वाहन मालकांना त्यांचे वाहनाबाबत कोणतीही उपयुक्त माहीती उपलब्ध होत नव्हती. तसेच त्यांची वाहने कोठे आहेत? याबाबतही त्यांना काहीएक माहीती मिळत नव्हती. आरोपींनी भाडे देण्याचे बंद केल्यानंतर व त्यांचा संपर्क बंद झाल्यानंतर त्यांची फसवणुक झाल्याचे लक्षात येत असे.

अशा प्रकारे पनवेल तालुका पोलीस ठाणेच्या पोलीस पथकाने मा. पोलीस आयुक्त, नवी मुंबई श्री बिपिन कुमार सिंह, मा. पोलीस सह आयुक्त डॉ. जय जाधव, मा. पोलीस उपआयुक्त, परिमंडळ—२, पनवेल श्री शिवराज पाटील, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, पनवेल विभाग श्री नितीन भोसले—पाटील यांचे मार्गदर्शनाखाली सदर गुन्हयाची यशस्वीरित्या उकल केलेली आहे. व त्यांनी संपुर्ण महाराष्ट्रातील अनेक जिल्हयात फिरून आरोपींनी अपहार करून विक्री केलेली वाहने हस्तगत केलेली आहेत. या कामगिरीमध्ये वरीष्ठ पोलीस निरीक्षक रंविंद्र दौंडकर यांचेसह पोनिरी(गुन्हे) अंकुश खेडकर, सपोनि विजय खेडकर, पोउपनिरी आकाश पवार, पोहवा/अमोल कांबळे, पोहवा/अमृत शिंदे, पोहवा/संतोष शिंदे, पोना/राकेश मोकल, पोना/सागर रसाळ, पोकॉ/राजकुमार सोनकांबळे व पोकॉ/सुनिल खैरणार, पोकॉ/प्रविण पाटील ( तांत्रिक विष्लेषण ) यांनी महत्वपुर्ण भुमिका बजविलेली आहे.

---

**अटक आरोपींकडून आतापावेतो उघडकीस आलेले गुन्हे**

१) पनवेल तालुका पोलीस ठाणे गुरनं ५७/२०२१ भादवि कलम ४०६,४२०,४६७,४६८,४७१,३४
२) पनवेल शहर पोलीस ठाणे गुरनं १८६/२०२१ भादवि कलम ४०६
३) डीबी मार्ग पोलीस ठाणे मुंबई गुरनं २३/२०२१ भादवि कलम ४२०,३४

---

**आरोपींकडून आतापर्यत हस्तगत करण्यात आलेली वाहने खालीलप्रमाणे**

| | | |
|---|---|---|
| १) | ३,५०,००/— | रू. किं. ची गोल्डन रंगाची ईर्टीगा कार नं. एम एच ४३ ए एन ४३९७, इंजिन नं. K14BN7017013, चेसीस नं. MA3ELMG1500194287 |
| २) | ४,५०,०००/— | रू. किं. ची पांढ—या रंगाची ईर्टीगा कार नं. एम एच ०४ जी जे ५८९५, इंजिन नं. D13A5016110, चेसीस नं. MA3FLEB1500227528 |
| ३) | ४,७५,०००/— | रू. किं. ची पांढ—या रंगाची ईर्टीगा कार नं. महाराष्ट्र ४६ ए पी २३७१, इंजिन नं. K14BN4012300, चेसीस नं. MA3ELMG1500340858 |
| ४) | ३,५०,०००/— | रू. किं. ची ग्रे रंगाची ईर्टीगा कार नं. एम एच ४६ ए एन ०२१५, इंजिन नं. 5382081, चेसीस नं. MA3ELB1S00441557 |
| ५) | ३,५०,०००/— | रू. किं. ची सिल्व्हर रंगाची ईर्टीगा कार नं. एम एच ०५ बी एस ३१४२, इंजिन नं. D13A2035357, चेसीस नं. MA3ELB1S00164295 |
| ६) | ४,००,०००/— | रू. किं. ची पांढ—या रंगाची XCENT CRDI कार नं. एम एच ४७ एन ५४८४, इंजिन नं. D3FAGM235823, चेसीस नं. MALA741DLGM232335 |
| ७) | ४,००,०००/— | रू. किं. ची निळया रंगाची EON ERA कार नं. एम एच ४३ ए एल ७२५८, इंजिन नं. G3HACM105288, चेसीस नं. MALA251ALCM118702 |
| ८) | ७,५०,०००/— | रू. किं. ची पांढ—या रंगाची ईनोव्हा कार नं. एम एच ४३ एल ८४५, इंजिन नं. 2KD6090764, चेसीस नं. MBJ11JV4007128530 (पनवेल शहर पो. स्टे. गुरनं १८६/२०२१ भादवि ४०६ मधील) |

९)  २,५०,०००/— रू. किं. ची ग्रे रंगाची, मारूती सुझूकी कंपनीची वॅगनर कार नं. एम एच ४६ डब्लु ८४८७, इंजिन नं. K10BN4501533, चेसीस नं. MA3EWDE1S00539854

१०)  ३,७५,०००/— रू. किं. ची पांढ—या रंगाची, मारूती सुझूकी कंपनीची स्विप्ट कार नं. एम एच ४३ एक्स ८३६३, इंजिन नं. G13BBN1274175, चेसीस नं. MA3EK41S00461344

————————————

४१,५०,०००/— रू एकूण

**आरोपीत नामे १) राजशेखर चिक्केगौडा (मयत)  २) सुरज नारायण पाटील, व ३) जगदिश उर्फ करण चुनीलाल चौधरी**